# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १४८११ /ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२२

## :: प रि प त्र क ::

या सचिवालयातील विविध कक्षांमार्फत केला जाणारा पत्रव्यवहार ग-१ कक्षातील जावक रजिस्ट्रीमार्फत सर्व संबंधितांना टपालाद्वारे तसेच मुंबई महानगर क्षेत्र व आसपासच्या परिसरातील पत्रे ग-१ कक्षातील चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांमार्फत हस्तबटवड्याद्वारे पाठविण्यात येतात.

नि:सत्र कालावधीत या सचिवालयातील विविध कक्षांमार्फत मुंबई महानगर क्षेत्र व आसपासच्या परिसरात हस्त बटवड्याद्वारे तातडीची पत्रे पाठविण्याकरिता वा अन्य तद्अनुषंगिक कामाकरिता ग-१ कक्षातील अधिकाऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच लेखी टिपणी सादर न करता ग-१ कक्षातील जावक लिपिक तसेच इतर चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर थांबविण्याबाबत अथवा शासकीय सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत थेट भ्रमणध्वनीवर अथवा कार्यालयातील दूरध्वनीद्वारे सूचित करण्यात येते. तथापि ग-१ कक्षातील जावक लिपिक व चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचारी संबंधित कक्षांच्या सूचनेनुसार सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहीले तरी त्यांच्या कार्यालयीन उपस्थितीची नोंद कार्यालयीन दस्तऐवजात / अभिलेखात होत नसल्याने संबंधित चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचारी उक्त दिवसाच्या बदली रजेस पात्र असतानाही भविष्यात त्यांना उक्त दिवसाची बदली रजा मंजूर करण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे याबाबत सुस्पष्टता आणणे गरजेचे असल्याने **नि:सत्र कालावधीत कार्यालयीन वेळेनंतर अथवा शासकीय सुट्टीच्या दिवशी मुंबई महानगर क्षेत्र तसेच आजुबाजुच्या परिसरात हस्त बटवडयाने टपाल वितरणासाठी अथवा अन्य तद्अनुषंगिक कामासाठी ग-१ कक्षातील जावक लिपिक तसेच चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यास त्याबाबत संबंधित कक्षाचे अवर सचिव यांच्या स्वाक्षरीची टिपणी ग-१ कक्षाकडे सादर करावी. सदरहू टिपणी ग-१ कक्षास प्राप्त झाल्यावर ग-१ कक्षामार्फत आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.**

(राजेश तारवी)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :-

(१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..२/-

(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

(४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव.

(५) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.

(६) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(७) या सचिवालयातील सर्व अधिकारी.

(८) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(९) समादेशक अधिकारी, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१०) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व कक्ष व कर्मचारी.

D:\data\g1 backup\sameer\paripatrak.docx